MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता®

विशेषांक, फेब्रुवारी २०१८

# साहित्य चर्चा आणि चिंतन



❖ संपादक ❖
प्रा.विराग गावंडे
डॉ.संजय कोठारी
डॉ.दिनेश निचीत

✲ प्रकाशक ✲
संत गाडगे महाराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वालेगांव,जि.अमरावती
आणि आधार सामाजिक संशोधन विकास प्रशिक्षण संस्था, अमरावती

www.vidyawarta.com

# || Index ||

01) आजचे स्त्रीयांचे वास्तववादी दर्शन
डॉ. अतुल टेवरे, || 09
कला वाणिज्य महाविद्यालय, येवदा

02) प्राचीन मराठीतील : आत्मचरित्र
डॉ. प्रविण कारंजकर, || 10
श्री साईबाबा लोकप्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर जि. वर्धा

03) संत तुकारामांच्या अभंगातून प्रकट झालेले सामाजिक व पारमार्थिक तत्त्वज्ञान
प्रा. बादलशाहा डोमाजी चव्हाण, || 13
मराठी विभाग, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

04) ''भटक्या विमुक्तांचे साहित्य: एक स्वतंत्र वाङ्मयीन प्रवाह''
प्रा. नेमीचंद एफ. चव्हाण || 16
सुधाकरराव नाईक कला, विज्ञान व उमाशंकर खेतान वाणिज्य महाविद्यालय अकोला

05) जागतिकीकरणातील नव्वदोत्तरी ग्रामीण कविता
प्रा.डॉ. प्रमोद दामोदर देवके || 24
यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय मंगरूळपीर जि.वाशिम.

06) रणजित देसाई यांच्या 'मोरपंखीसावल्या' या कथासंग्रहातील निसर्ग व प्राणी जगत
प्रा. डॉ. अन्नपुर्णा अजाबराव चौधरी || 27
श्री. बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा

07) नव्वदोत्तरी ग्रामीण साहित्यातील सामाजिक संदर्भ
प्रा.डॉ.शरद वाघोळे || 29
य.च.कला व विज्ञान महाविद्यालय,मंगरूळपीर

08) केतकरांच्या कादंबरीतील स्त्रीचित्रण
प्रा.डॉ.सौ.यू.आर.पाटील || 33
मराठी विभाग प्रमुख शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय,कराड.
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर,संलग्नित.

09) लोकनाथ यशंवत हयांची कविता :— एक चिकित्सक अभ्यास
प्रा. डॉ. सुरेश खोब्रागडे || 38
विदर्भ कला—वाणिज्य महाविद्यालय लाखनी, ता.लाखनी, जि भंडारा



https://sites.google.com/site/vidyawartajournal — http://www.vidyawarta.blogspot.com

06

# रणजित देसाई यांच्या 'मोरपंखीसावल्या' या कथासंग्रहातील निसर्ग व प्राणी जगत

प्रा. डॉ. अन्नपुर्णा अजाबराव चौधरी
श्री. बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा

**********

**प्रस्तावना :—**

रणजित देसाई हे मराठी साहित्यातील नामवंत लेखक आहे. त्यांच्या वाङ्मयात समाज जीवनातील विविध स्तर अधोरेखित झाले आहे. साहित्य आणि समाज यांचा अन्योन्य संबंध आहे. समाजाकडून साहित्याला जीवन सत्य आणि वास्तववादी आशय प्राप्त होते.

कथा, कादंबरी, नाटक या तीनही वाङ्मयक्षेत्रात रणजित देसाई हे नाव सर्वश्रृत आहे. 'स्वामी' ही ऐतिहासिक कादंबरी प्रसिद्ध झाल्यापासून ते 'स्वामी' कार म्हणून ओळखले जातात. त्याचबरोबर 'बारी', 'माझा गाव', 'श्रीमान योगी', 'समिधा' 'प्रतिक्षा', 'जंगल शेखरा' या कादंबऱ्याही लोकप्रिय ठरल्या. त्याचबरोबर 'मोरपंखी सावल्या', 'रूपमहाल' यासारखे कथा, कादंबरीचे विविध प्रकार रणजित देसाई यांनी प्रस्तुत केले. त्यांची कादंबरी, ग्रामीण, सामाजिक, ऐतिहासिक, चरित्रात्मक म्हणून प्रसिद्ध आहे तर कथा सामाजिक, ऐतिहासिक, संगीत, प्राणी व निसर्ग अशा प्रकारची आहे.

रणजित देसाई हे प्रतिभावंत लेखक होते तसेच ते जातिवंत शेतकरी होते. ते स्वत:ला लेखकापेक्षाही शेतकरी म्हणवण्यात धन्यता मानत त्यांनी शेतात वेगवेगळ्या प्रकारची झाडे लावली. झाडांवर वृक्षवेलीवर त्यांचे अतिशय प्रेम होते. त्यांनी विविध रोपवाटीका तयार केल्या. रणजित देसाई यांचे माणसापेक्षा प्राण्यावर अतिशय प्रेम होते. त्यांनी अनेक जंगलांना भेटी दिल्या. शिकारी पाहिल्या. जंगलातील अनेक जीवननाट्ये त्यांनी पाहिली अनुभवली. प्राण्यांची होत असलेली शिकार बघून त्यांचे मन विव्हळले. त्यांना निसर्ग प्राणी बघण्याची आवड होती. यातूनच त्यांच्या शिकार कथा, निसर्ग कथेने आकार घेतला. बदलत्या सामाजिक वास्तवाला अनुसरून समाजभान ठेवून त्यांनी कथालेखन केले.

**रणजित देसाई यांची निसर्ग, प्राणी कथा :—**

रणजित देसाई यांना मुळातच निसर्गाची आवड व ओढ होती. त्यांना जितकी माणसाची ओढ तितकीच निसर्गाची ओढ होती. निसर्ग प्राणी त्यांच्याशी बोलत असे त्यांच्या कथेतील निसर्ग केवळ वातावरण निर्मितीसाठी नव्हता तर त्यांनी आपल्या कथेत निसर्गाला स्वतंत्र अस स्थान बहाल केल होत. माणसाप्रमाणेच त्यांचे निसर्गावर देखील निस्सीम प्रेम होते. जिव्हाळा होता. मानवाला शैशवावस्थेतील वाढत्या जाणिवेबरोबरच पशुपक्षांचे खास आकर्षण असते. पशुपक्षांच्या माध्यमातून मानवी जीवनाचे सूत्र मार्मिकतेने सांगण्याचा प्रयत्न अशा प्राणीकथांतून केलेला असतो. ग्रामीण जीवनात निसर्ग आणि प्राणी हे त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग असतो. शेतकरी जीवनाशी संबंधीत असे प्राणी गाय, म्हैस, शेळी, कुत्रा, घोडा, कोंबड्या या सर्वामध्ये शेतकऱ्याचे भावबंध गुंतलेले असतात. ग्रामीण जीवन व निसर्ग यांचा अतुट स्नेहबध असतो. बहुसंख्य लेखकांनी आप—आपला परिसर साहित्यातून अधोरेखीत केला.

रणजित देसाई यांना सुद्धा निसर्गाची ओढ असल्यामुळे त्यांनी निसर्गकथा प्राणीकथा लिहिल्या त्यांच्या 'मोरपंखी सावल्या' हा प्राणीजीवनावरील १९८४ मध्ये वाचकांसमोर आला ग्रामीण समाजाला निसर्गाच सानिध्य सहजसुलभ असतं निसर्गाशी जुळवून घेत झुंज देत ग्रामीण माणूस जगत असतो. पशू—पक्षी, कीटक इत्यादीसह येणारा ग्रामीण जीवनातील निसर्गाचा घटक अपरिहार्यपणे खास वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या कथात निसर्गाला स्वतंत्र अस्तित्व आहे. त्यांच्या कथेतील घटनांमधून निसर्ग डोकावण्याऐवजी निसर्गाच्या आधारानेच घटना घडत राहाते. एखाद्या पक्षाचा प्राण्याचा किंवा किटकाचा उल्लेख येतो आणि त्याच्या पार्श्वभूमीवर ही घटना असते. डॉ. विजया राजाध्यक्ष म्हणतात,

'त्यांच्या एकूणच जीवन शैलीला सरंजामशाहीचा खास एक स्पर्श होता. ते खूप फिरत माणसं पाहात. त्यांची स्वभाववैशिष्ट्ये, शरीरवैशिष्ट्ये टिपत. माणसांएतकीच त्यांना निसर्गाची खूप ओढ होती. त्यांना झाडांना भेटावस वाटे. प्राणी त्यांना समजत पक्षी त्यांच्याशी बोलत''. मनातील निसर्गाविषयीच्या प्रतिक्रियांची फलश्रुती म्हणजे ''मोरपंखी सावल्या'' हा कथासंग्रह आहे. त्यांची कथा कथानक, व्यक्तीरेखा, घटना, वातावरण इ. द्वारे न फुलता निसर्गवर्णनातून फुलत जातांना दिसते.

'मोरपंखी सावल्या' हा कथासंग्रह निसर्ग, माणूस आणि प्राणी यांचा अतुट संबंध दर्शवणारा कथासंग्रह आहे. या संग्रहातील 'वसंत' या कथेत वसंतऋतूच आगमन होतांना निसर्गातील भावनिक आंदोलनाचा परामर्ष लेखकाने घेतला. निसर्गाला वसंताची चाहुल लागल्यावर मान उंचावून उभा असलेला वृक्ष, चोरपावलांनी उतरवलेले दवाचे थेंब, धूसर झालेले धुके पक्षांची किलबिल, खारीला दिसेलेला एक इवलासा कोवळा कोंब, खारीला पानाच्या जागी आलेल्या त्या कोंबातून वसंत ऋतू सर्व रानावर आल्याची खबर मिळते. वसंतऋतूत आनंदमयी झालेल्या इवल्या खारूटीचे वर्णन लेखकाने या कथेत केले.

'वहिनी' या कथेत सुरूवातीला सगळीकडे होरपळणाऱ्या सृष्टीचे वर्णन आहे. अचानक पाऊस येतो. वीज डोळे दिपवून जाते. उभ्या पावसाने नदीचे पात्र भिजते. शिवारातील ओढ्या, नाल्यातून प्रवाहातून पुराचे पाणी वाहते. नदी भरून वाहते. मातीचा दरवळ सर्वत्र पसरतो. खेकडे बिळाबाहेर डोकावतात, बगळे झाडावर घरटे बांधतात. नदीचे आणि निसर्गाचे प्रभावी वर्णन रणजित देसाईंनी या कथेत केले आहे. 'नजर' या कथेतील नदी एकाकी नाही तिच पात्र खंडित झालेले आहे तरी त्यात मासे आहेत. नदीतील जीवनाची ती एक जिवंत खूण आहे. गोजळेची एक नर मादीची जोडी त्या नदीत आहे. मानवी जीवनातील इतर स्त्रियांसारखीच ती आई होण्याच्या ओढीने जबाबदारीने वागते. ती आपल्या पिलांचे रक्षण करते. मातृहृदयाची जिवंत कहानी या कथेत स्पष्ट होते.

'अंधारातून उजेडाकडे' या कथेत काळ्याकुट्ट रात्रीचे वर्णन लेखकाने केलेले आहे. शिकाऱ्याच्या टॉर्चच्या उजेडात लुसलुशीत गवत खाणारा ससा त्याच्या गोळीला बळी पडतो. याच साधंसं पण परिणामकारक चित्रण या कथेत आहे. 'सुख' या कथेत कोल्हा आणि खेकडा यांच्यामधील स्नेह, जिव्हाळा अधोरेखीत झाला. कोल्हा हा संपूर्ण प्राणिसृष्टीत अतिशय धूर्त म्हणून ओळखला जातो. त्याच्या धूर्तपणाचा प्रत्यय या कथेत येतो.

'निर्णय' या कथेत गरूडाचं जगणं, राजेपण जगण्यातील आव, कालांतरानं स्वभाविकरीत्या येणार वार्धक्य, त्याच्या जीणिवेने शेवटी झोकून देण्याचा घेतलेला निर्णय हे सर्व या कथेत आहे. गरूडाच्या जगण्याचे वर्णन या कथेत आहे.

मेघ सिधये यांच्या मते, ''त्या प्राणिकथातून माणूस या प्राण्याच्या हाती बरीच जीवनसत्वे येतात. एक संपन्न जीवन दृष्टी मिळते. चराचर सृष्टीशी संवाद साधण्याचा आनंद मिळतो आणि या कथांची उंची आपोआप जाणवते. या कथा म्हणजे नुसती निसर्गवर्णने नव्हेत सिद्धहस्त लेखकाच्या शैलीचा नुसता मनोरम विलास नव्हेत तर रसिकमनाला शितलता देणाऱ्या आणि अंत:चक्षूंना सत्य, शिव सुंदराचे तेज दाखवणाऱ्या या मोरपंखी सावल्या आहेत'' रणजित देसाई यांच्या कथेतील जिवंत वातावरण निर्मिती वाचकांच्या नजरेत भरल्याशिवाय राहत नाही.

'मृग' या कथेत माणसाच्या तडाख्यातून सुटण्याची मृगाची धडपड, सावरीच तृप्त समाधान नर आणि मादी यांच्यातील शृंगारचं हरणाच्या माध्यमातून कलात्मकतेने घडते. 'जाग' या कथेत रानात पहाट कशी फुटते याचे वर्णन येते. या कथेत निसर्गाला आलेली जाग अतिशय वेगळ्या पद्धतीने लेखकाने चित्रित केली. झिराझिरीत काळोखात निजलेली रात्र रस्ता त्या रात्रीत तसाच पडून आहे. म्हाताऱ्याच्या खोकण्याचा आवाज लेकराच्या रडण्याचा आवाज, घुबडाचा आवाज, जात्याचा आवाज हे सर्व आवाज त्या भल्या पहाटे एकत्रित झालेले आहेत. झाडावरच्या चिमण्या जाग्या होतात, लिंबाच्या झाडावरून कावळा काव काव करतो आहे. चिमण्यांची चिवचिव वाढते आहे. आपल्या शेपटीचे गोंडे फडकवीत चकचक खारी फांद्यावरून पळत आहेत. भारद्वाजची लेकरं

आसमंतात घुमते आहे, तळे बगळ्याच्या आवाजाने जागे होत आहे. हिरव्या पानावर उंचावलेले कमळ अकारण डोलत आहे आणि दिवस उगवायला अजून खूप वेळ असतानाच धरती जागी झाली'' साऱ्या निसर्गाला, प्राण्यांना आणि नंतर मानवी जीवनाला येणारी जाग या कथेत चित्रित झाली. 'मोरपंखी सावल्या' या कथासंग्रहातील कथांमधून झाड, नदी, पाणी, ऊन, सावली, वारा, ओहोळ, झरा, वाघ, माकड, कोल्हे, तरज, चितळ, वाहाळ, ससे, घुबड, हरीण, मासे, कोंबड्या, कावळे, कुत्रे, चिमण्या या निसर्गघटकांचे अस्तित्व अधोरेखीत झाले. मानवी मनाचे सूक्ष्म प्रतिबिंब या निसर्ग घटकात लेखकाने पाहिले आहे.

सारांश :—

रणजित देसाई यांची निसर्ग व प्राणी यांचे वर्णन अतिशय सूक्ष्मपणे केले आहे. प्राणिकथा या अतिशय वास्तववादी आहेत. निसर्ग व प्राणी यांचे कथेतून आलेले चित्रण लेखकाने अतिशय तन्मयतेने केलेले आहे. त्यांच्या कथेतील निसर्ग मानवी जीवनाशी एकरूप झालेला आहे.

रणजित देसाई यांना प्राणी जगताशी निष्ठा व अतिशय जिव्हाळा आहे आपुलकी आहे. ग्रामीण जीवनाचा हे प्राणी जगत एक अविभाज्य भाग आहे. शेतीव्यवसायाशी संबंधीत हे प्राणी मानवाच्या उपयोगाला येणारे आहे. गाय, म्हैस, बैल, शेळी, मेंढी असे प्राणी ग्रामीण मानसाशी कृषीसंस्कृतीशी नाते सांगतात. हिंस्र प्राण्यांची हत्या घडू नये हेही काही कथांमधून सूचित केले. शेतकरी व प्राण्यांचे परस्पर संबध अतिशय दृढ असतात हे लेखकाने काही कथांतून अधोरेखित केले.

लेखकाला जसे माणसे प्रिय आहेत तसे प्राणी, वृक्ष व पर्यायाने निसर्ग प्रिय आहे याची साक्ष अनेक कथा देवून जातात.

संदर्भ ग्रंथ :—


- देसाई रणजित — 'मोरपंखी सावल्या', दुसरी आवृत्ती १९९८, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
- राजाध्यक्ष विजया — पुढारी, १४ मार्च १९९३
- सिधये मेघा — माणूस ११ जानेवारी १९८६


❑❑❑

**07**

# नव्वदोत्तरी ग्रामीण साहित्यातील सामाजिक संदर्भ



प्रा. डॉ. शरद वाघोळे
य. च. कला व विज्ञान महाविद्यालय, मंगरूळपीर


**********

ग्रामीण कथा, ग्रामीण कविता, ग्रामीण कादंबरी इत्यादी सर्वच प्रकारात ग्रामीण साहित्याने मोलाची भर घातली. भास्कर चंदनशिव, वासुदेव मुलाटे, उध्दव शेळके, बाबाराव मुसळे, विठ्ठल वाघ, इंद्रजित भालेराव, श्रीकांत देशमुख, सदानंद देशमुख, राजन गवस, रविंद्र शोभणे, प्रतिमा इंगोले, श्रीराम गुंदेकर, शेषराव मोहिते, तानाजी पाटील, आनंद पाटील, अजिम नवाज राही, नरेंद्र इंगळे, पुरूषोत्तम बोरकर इत्यादी अनेक साहित्यिकांनी आपल्या अनुभवाची व त्यांना दिसलेल्या समाज वास्तवावर आपले विचार ग्रामीण साहित्याच्या वेगवेगळया प्रकारातून व्यक्त केले.ग्रामीण पातळीवर जीवन जगू पाहणा—या सर्व सामान्य मानसाच्या जीवनाला दुयमत्व कां प्राप्त झाले याचा त्यांनी शोध घेण्याचा प्रयत्न केला.

ग्रामीण लेखक ग्रामीण परिसरातील समस्या समोर ठेवून त्यावरिल उपाय शोधण्याचा प्रयत्न करीत आहेत.खेडयातील सामाजीक बदलांचे पडसाद त्यांच्या ग्रामीण साहित्यातून मांडणी करून सोडविण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो आहे.शेती, निसर्ग, शेतमजूरी, हवामान, शेतमालाचा कमी भाव, बेकारी, दारिद्र्य, कौटुंबातील ताण, दबाव गटाचे राजकारण, परस्पर हेवेदावे, जातीय संघर्ष, अवर्षण, हरवत गेलेली माणूसकी यांचे चित्रण साहित्यामधून पुढे आणण्याचे ग्रामीण कादंबरी लेखकांचे प्रयत्न सुरू आहेत ग्रामीण जीवनातील प्रश्न डोळयापुढे ठेवून त्यावर आपले मत प्रगट करतांना ती समस्या सोडविण्याचा या लेखनाचा प्रयत्न आहे.

ग्रामीण जीवन झपाटयाने बदलत जात आहे. शिक्षण, आरोग्य, आर्थिक जीवन, बदलत गेलेले



# Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati.

## CERTIFICATE

ISSN 2319-9318

UGC Approved J.No.62759

**This is to certify that Prof./Dr./Mr./Mrs./Ms.** प्रा. डॉ. अन्नपुर्णा अजाबराव चौधरी

**Of** श्री. बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा

**has published a paper on** रणजित देसाई यांच्या 'मोरपंखीसावल्या' या कथासंग्रहातील निसर्ग व प्राणी जगत

**Monthly Peer Reviewed International Research Journal Special Issue on "Language" Published on Dated 5, February - 2018.**

*Prof. Virag Gawande*
Director
*Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati*

*Prof.Dr.Sanjay j. Kothari*
Editor (Social Sciences)
*G.S.Tompe Arts Comm,Sci Collage Chandur Bazar Dist. Amravati*

*Dr. Dinesh W. Nichit*
Editor (Commerce)
*Sant Gadge Maharaj Arts, Commerce & Science College, Walgaon*